|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र प्रशाळेमधील इलेक्ट्रॉनिक्स विभागात एम.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेण्याची प्रक्रिया सुरु असून ज्या विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी ऑनलाइन नोंदणी केली नसेल अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने २८ जुलै पासून पुन्हा संधी उपलब्ध करून दिली आहे. या अभ्यासक्रमासाठी B.Sc. (Electronics/Physic/Computer Science/ Electronics Science) किंवा B.Voc. in Industrial Automation किंवा B.E. / B.Tech. with Electronics and Telecommunication / Electronics / Instrumentation असलेले विद्यार्थी प्रवेशास पात्र राहतील. अधिक माहिती www.nmu.ac.in या वेब साईट वर UG/PG Admission 2023-2024 मध्ये मिळेल. अधिक माहितीसाठी 9422338132 या क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन प्रशाळेचे संचालक प्रा.ए.एम. महाजन यांनी केले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि एमकेसीएल यांच्यात सामजंस्य करार करण्यात आला असून या करारा अंतर्गत विद्यार्थ्यांना कौशल्य विकसनाचे ६७ कोर्सेस उपलब्ध होणार असून त्यामुळे रोजगारासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ निर्माण करण्यात मोठा हातभार लागणार आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण सप्ताह अंतर्गत हा सामजंस्य करार करण्यात आला आहे. या धोरणात विद्यार्थ्यांना क्रेडीट पुर्ण करणे आवश्यक असून एमकेसीएलसोबत झालेल्या करारामुळे ६० तासांचे दोन क्रेडीट असलेले आणि १२० तासांचे ४ क्रेडीट असलेले प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत. त्यासाठी विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागणार आहे. मात्र सर्व अभ्यासक्रम कुशल मनुष्यबळ निर्माण करणारे आहेत. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमांमध्ये अंकाऊटींग करिअरसाठी ५, बॅक ऑफिस करिअरसाठी ५, डिझाईनिंग करिअरसाठी १०, डिजिटल आर्ट करिअरसाठी ६, डिजिटल फ्रीलान्स करिअरसाठी २, फ्रंट ऑफिस करिअरचे ५ आणि आयआर करिअरचा एक प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहे. याशिवाय आयटी हार्डवेअर व नेटवर्क मॅनेजमेंट, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट करिअरसाठी ३३ प्रमाणपत्र अभ्यासक्रम यामध्ये निश्चित करण्यात आले आहेत. कौशल्य विकासासोबतच संभाषण कौशल्य, भाषिक क्षमता वाढविणे, विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, समुपदेशन करणे हे देखील केले जाणार आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धा लक्षात घेवून बाजारपेठेत कौशल्य असलेले मनुष्यबळ निर्माण करणे हा या सामजंस्य कराराचा प्रमुख उद्देश आहे. एमकेसीएल अंतर्गत नॉलेज लिट करिअरर्स (KLIC) असे हे कोर्सेस या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणार असून विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर स्कील डेव्हलपमेंटच्या लिंकवर विद्यार्थ्यांना नोंदणी करता येईल. अशी माहिती विशारद स्कील डेव्हलपमेंट केंद्राच्या समन्वयक तथा व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेच्या संचालक प्रा. मधुलिका सोनवणे यांनी दिली. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत झालेल्या या सामजंस्य करार प्रसंगी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विशारद केंद्राच्या समन्वयक प्रा. मधुलिका सोनवणे, एमकेसीएलचे वरिष्ठ महाव्यवस्थापक डॉ. रेवती नामजोशी, वरिष्ठ महाव्यवस्थापक अजित शिंदे, संतोष बिरारी आदी उपस्थित होते.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २७ जुलै, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी